**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचाअधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे-४११ ००१

श्री. सुधीर माधव जोशी.
फ्लॅट क्र.१५, बिल्डिंग क्र .२,
५८७, दत्तप्रकाश सोसायटी,
पुणे सिंहगड रोड, पुणे -३०

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**उत्तरवादी**

**अपिलीय प्राधिकारी.**

चिंचवड देवस्थान ट्रस्ट कार्यालय,
मंगलमूर्ती वाडा, चिंचवड गाव,
पुणे-३३.

**जन माहिती अधिकारी.**
चिंचवड देवस्थान ट्रस्ट कार्यालय,
मंगलमूर्ती वाडा, चिंचवड गाव,
पुणे-३३.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३१/पुणे |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दिनांक २२.८.२००६ |
| ३ | जन माहिती अधिकाराचा गटाचा | दिनांक १५.०९.२००६ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दिनांक २७.११.२००६ |
| ५ | अपीलीय प्राधिका-याच्या गटाचा | दिनांक २१.१२.२००६ |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** चिंचवड देवस्थान ट्रस्टच्या विश्वस्तांची नावे, पत्ते, कालावधी, देवस्थानाची स्थावर व जंगम मालमत्ता. देणग्या तसेच वार्षिक अहवालाच्या प्रती इ. | |

## विवेचन

सार्वजनिक विश्वस्त संस्थेला (ती सार्वजनिक प्राधिकरण ठरत नसल्यास ) माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिट पिटीशन क्रमांक ५२९४/२००८ प्रकरणी दिला आहे. विषयांकित संस्था सार्वजनिक प्राधिकरण ठरते, याबाबतचे कोणतेही पुरावे अपीलकर्ता श्री. सुधीर माधव जोशी यांनी दिलेले नाहीत. त्यामूळे सदरचे अपील हे दाखलयोग्य ठरत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- ३०.०९.२०१०

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. विनायक श्रीकांत कोटणीस
६१/६२, शुक्रवार पेठ, अनंत इंग्लीश
स्कूल पुढे, सातारा-२ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपायुक्त (नगरपालिका प्रशासन), पुणे विभाग, विधान भवन, पुणे - ४११ ००१. — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक संचालक (नगरपालिका प्रशासन), पुणे विभाग, विधान भवन, पुणे - ४११ ००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३२ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.१.२००९ |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** — श्री. विनायक श्रीकांत कोटणीस, ६१/६२, शुक्रवार पेठ, अनंत इंग्लीश स्कूल पुढे, सातारा-२<br><br>**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक संचालक (नगरपालिका प्रशासन), पुणे विभाग, विधान भवन, पुणे -४११ ००१, श्री. एस. एस. गोसावी | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०.४.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १.५.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०.२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ४.७.२००६ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

गावठाणामध्ये हद्दीबरोबर बांधकाम करण्याच्या नियमावलीची माहिती मागणाऱ्या आपल्या अर्जावर व बांधकामाबाबत मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद, सातारा यांनी दिलेल्या निर्णयाविरुध्द 'सक्षम अधिकाऱ्याकडे' अपील करण्याबाबत अपिलीय प्राधिकारी तथा उपायुक्त, (नगरपालिका प्रशासन), पुणे विभाग, पुणे यांनी कळविले. परंतु 'सक्षम अधिकारी' कोण याची माहिती तेव्हा दिली नाही. याच विषयाबाबतच्या आपल्या अपील क्र.१४०, १८७ मध्ये आयोगाने आदेश देऊनही मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद, सातारा यांनी ही माहिती दिलेली नाही. संचालक, नगररचना संचालनालय, पुणे हे सक्षम अधिकारी असतील, असे त्यांनी कळविले. मात्र मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद, सातारा, जिल्हाधिकारी, सातारा, विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे व आयुक्त, नगरपालिका प्रशासन, मुंबई हे सक्षम अधिकारी असल्याचे या विविध अधिकाऱ्यांनी कळविले. तसेच बांधकाम परवानगी दिल्याविरुध्द कोठे अपील करावे याची नियमावलीत तरतूद नसल्याचेही कळविले. त्यामुळे आपल्याला नेमकी माहिती मिळत नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. विनायक श्रीकांत कोटणीस यांनी केले. बांधकाम परवानगी नाकारली असल्यास अपिलाची तरतूद आहे, परंतु दिलेल्या बांधकाम परवानगीबाबत अपील करण्याची तरतूद विकास नियंत्रण नियमावली (डी.सी.रुल) मध्ये नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, (नगरपालिका प्रशासन), पुणे विभाग, पुणे श्री. एस. एस. गोसावी व अपिलीय प्राधिकारी तथा उपायुक्त, (नगरपालिका प्रशासन), पुणे विभाग, पुणे यांचे प्रतिनिधी म्हणून श्री. एस. एस. गोसावी यांनी केले.

अपीलकर्ता श्री. कोटणीस हे सातत्याने एकाच बांधकामाच्या संदर्भात अर्ज व अपिले करीत असून आपल्या शेजाऱ्याने केलेल्या बांधकामावर कारवाई करण्याची त्यांची मागणी आहे. ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. तसेच त्या बांधकामामुळे आपल्या मालमत्तेची किंमत कमी झाली ही त्यांची तक्रारही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत दखलयोग्य नाही. मात्र मूळ उत्तरानुसार 'सक्षम अधिकारी' कोण याची माहिती त्यांना दिली गेली पाहिजे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक (नगरपालिका प्रशासन), पुणे विभाग, विधान भवन, पुणे यांनी उपरोक्त प्रकरणी सर्व यंत्रणांशी समन्वय साधून अपीलकर्ता श्री. विनायक श्रीकांत कोटणीस यांना संबंधित विषयात 'सक्षम अधिकारी' कोण याची नेमकी माहिती दि. १५.२.२०१० पर्यंत द्यावी.

**पुणे**
**दि.** २८.१.२०१०

**( विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. नामदेव भागुजी तातळे — अपीलकर्ता
गुरूकृपा सहकारी गृह निर्माण संस्था,
पडवळ चाळ, आनंदगड, पार्कसाईट, विक्रोळी,
मुंबई- ४०० ०७९

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अध्यक्ष, महात्मा गांधी तंटामुक्त गाव समिती, ऊगलेवाडी ता. आंबेगाव, जि. पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचीव, महात्मा गांधी तंटामुक्त गाव समिती, ऊगलेवाडी, ता. आंबेगाव, जि. पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३२६ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १९.६.२००९ |
| ३ | **उपस्थित**<br><br>**अपीलकर्ता** | श्री. नामदेव भागुजी तातळे<br>गुरूकृपा सहकारी गृह निर्माण संस्था,<br>पडवळ चाळ, आनंदगड, पार्कसाईट, विक्रोळी,<br>मुंबई- ४०० ०७९ |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ११.५.२००८, ११.५.२००८, १०.६.२००८, १९.६.२००८ व १४.७.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ७.८.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १९.६.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

मौजे उगलेवाडी, ता. आंबेगाव, जि. पुणे येथील महात्मा गांधी तंटा मुक्त गाव समितीचा कारभाराबाबतची माहिती आपल्याला जाणीवपूर्वक दिली जात नसल्याची तक्रार अपीलकर्ता श्री. नामदेव भागुजी तातळे यांनी केली. समितीचे अध्यक्ष श्री. बजरंग तुकाराम ऊगले यांच्या पत्रानुसार माहितीसाठी रू.१५०/- शुल्क भरूनही माहिती दिली नाही, असे त्यांनी नमूद केले.

श्री. तातळे यांनी अनेक अर्ज केले असून मागितलेली माहिती दि. ७.८.२००८ च्या पत्रान्वये दिल्याचे श्री. ऊगले यांच्या पत्रात नमूद केले आहे. श्री. तातळे यांनी त्यांच्याकडेच प्रथम अपील केल्याचे दिसते. गृह सचीव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई, पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, उपविभागीय पोलीस अधिकारी, खेड उपविभाग, खेड आदींकडेही श्री. तातळे यांनी याच स्वरूपाचे अर्ज केले असून उपविभागीय पोलीस अधिकारी, खेड उपविभाग, खेड यांनीही श्री. तातळे यांना तपशीलवार माहिती देणारे उत्तर पाठविल्याचे कागदपत्रांवरुन दिसते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. ३०.१.२०१०**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकिय इमारत, चौथा मजला,
कौन्सील हॉल समोर, पुणे ४११००१

श्री. मिलिंद किसन उमरे,
रा. राजूर (कॉ.), ता. वणी,
जि. यवतमाळ.

अपीलकर्ता

विरूध्द

जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत राजूरा (कॉ.),
ता. वणी, जि. यवतमाळ.

उत्तरवादी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४/२०१०/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०/११/२००९ |
| ३ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती-** सन २००५ पासून ग्रामपंचायत, राजुरा (कॉ.), ता. वणी कडून करण्यात आलेला खर्च व प्रत्यक्ष जमा याबाबत. | |

## विवेचन

अपीलकर्ता, श्री. मिलिंद किसन उमरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपीलासोबत जोडलेल्या कागदपत्रांवरुन त्यांनी अपिलीय प्राधिकाऱ्याकडे प्रथम अपील केल्याचे दिसून येत नाही. सबब उक्त अधिनियमातील कलम १९ (१) अन्वये संबंधित अपिलीय प्राधिकाऱ्याकडे प्रथम अपील करणे आवश्यक असल्याने त्यांनी आयोगाकडे केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे
दि. १९.०९.२०१०

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री.वामन व्यंकटेश रूईकर
७०८ ई, शिवनेरी अपार्टमेंट, शाहूपुरी.
४ थी गल्ली, कोल्हापूर

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर निबंधक, (तपासणी व निवडणूक ) सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-१

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा

१. अवसायक, दि महाराष्ट्र को.ऑप.इंजिनिअरिंग सोसायटी लि. शिरोली, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर

२. व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्यादित, प्रादेशिक कार्यालय, पुणे-५

३. कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्यादित, फोर्ट, मुंबई-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४५ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११.१२.२००८ |

३ **उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर निबंधक, (तपासणी व निवडणूक ) सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ श्री. एम.बी.त्रिभुवन

**जन माहिती अधिकारी** तथा

१. अवसायक, दि महाराष्ट्र को.ऑप.इंजिनिअरिंग सोसायटी लि. शिरोली, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर
श्री. व्ही. आर. चव्हाण

२. व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्यादित, प्रादेशिक कार्यालय, पुणे-५
श्री. मिलिंद अंबादास भावसार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४.११.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २२.११.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.१२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७.२.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अवसायनात गेलेल्या संस्थेची माहिती आपण मागितली होती. अवसायकाने व महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने माहिती न दिल्यामुळे आपण अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर निबंधक (तपासणी व निवडणूक ) सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे अपील केले. पंधरा दिवसांत माहिती देण्याचे आदेश अपिलीय प्राधिकारी यांनी दिल्यानंतरही माहिती दिली गेली नाही. एक महिन्यात माहिती देण्याचे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी सर्वसंमतीने ठरले. त्यानुसारही माहिती मिळाली नाही. त्याबद्दल संबंधितांवर दंडात्मक कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. वामन व्यंकटेश रूईकर यांनी लेखी निवेदनाद्वारे केली.

दि महाराष्ट्र को. ऑप. इंजिनिअरिंग संस्थेची संपूर्ण मालमत्ता महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडे तारण होती. त्यांनी ती ताब्यात घेऊन विक्रीची व्यवस्था त्यांच्या पातळीवर ठेवली होती. त्यांच्याकडून माहिती मिळाल्यानंतर उपलब्ध करून देण्यात येईल, असे आपण स्पष्ट केले होते व तसे प्रयत्न केले. तथापि माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ आपल्याला लागू होत नसल्याची भूमिका महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने घेतली. मात्र माहिती देणे आवश्यक असल्याचे बँकेला कळविले. त्यांच्याकडून दि. २.८.२००८ रोजी व दि. ६.८.२००८ रोजी माहिती प्राप्त झाली, ती दि. ११.८.२००८ रोजी श्री. रूईकर यांना पाठविण्यात आली, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा अवसायक, दि महाराष्ट्र को. ऑप. इंजिनिअरिंग सोसायटी लि., शिरोली श्री. व्ही. आर. चव्हाण यांनी लेखी व तोंडी केले.

'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील चर्चेनंतर श्री. रूईकर यांना मूळ अर्जानुसारच माहिती दि. २८.७.२००८ रोजी पाठविण्यात आली. त्यानंतर त्यांनी मागितलेली अतिरिक्त माहितीही दि. ७.८.२००८ च्या पत्रान्वये अवसायकांना पुरविण्यात आली, असे प्रतिपादन संबंधित विषयातील

कार्यवाहीच्या प्रक्रियेच्या स्पष्टीकरणासह जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्यादित, प्रादेशिक कार्यालय,पुणे श्री. मिलिंद अंबादास भावसार, जन माहिती अधिकारी तथा अवसायक, दि महाराष्ट्र को.ऑप. इंजिनिसरिंग सोसायटी लि., शिरोली श्री. व्ही. आर. चव्हाण, व जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्यादित, फोर्ट, मुंबई श्री. डी. एम. मोहोळ यांनी लेखी व तोंडी केले.

प्रक्रियेतील गुंतागुंत लक्षात घेता माहिती देण्यास झालेला विलंब क्षमापित करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ७.१.२०१०

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. चंद्रकांत राजाराम क्षीरसागर — अपीलकर्ता
८४, रेल्वे लाईन, सोलापूर

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रशासन अधिकारी, महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य लिपिक, महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५४ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २८.१.२००९ |
| ३ | उपस्थित<br>**जन माहिती अधिकारी** तथा मुख्य लिपिक, महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर श्री. विलास सु. लोकरे | |
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.१०.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.११.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ७.१२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ५.१.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

विवेचन

शालेय पोषण आहारासंबंधीची सन १९९८ पासूनचे शासन निर्णय, शासकीय परिपत्रके यांची व सोलापूर शहरातील शाळांमधील या योजनेबाबतच्या वस्तुस्थितीची माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपिक, महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर

श्री. विलास सु. लोकरे यांनी दिली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा प्रशासन अधिकारी, महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर यांनी अपिलाची योग्य दखल घेतली नाही. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपिक व अपिलीय प्राधिकारी तथा प्रशासन अधिकारी, महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. चंद्रकांत राजाराम क्षीरसागर यांनी अपील अर्जात व लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

एका शाळेच्या मुख्याधिपिकेला निलंबित करण्याची श्री. क्षीरसागर यांची मागणी होती. माहितीबाबत विहित मुदतीत कळविण्यात आले, परंतु श्री. क्षीरसागर यांनी माहिती स्वीकारली नाही व प्रथम अपिलाच्या सुनावणीबाबत योग्य सहकार्य दिले नाही, असे जन माहिती अधिकारी तथा लेखापाल व अपिलीय प्राधिकारी तथा प्रशासन अधिकारी, महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर यांनी लेखी नमूद केले आहे. माहितीबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दोन दिवसांत सादर करण्याचे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा लेखापाल यांनी नमूद केले. त्यांची विनंती आयोगाने मान्य केली. त्यानुसार अपिलीय प्राधिकारी तथा प्रशासन अधिकारी, महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर यांनी दि. २.२.२००९ च्या पत्रान्वये आयोगाला अहवाल सादर केला. श्री. क्षीरसागर यांच्या दि.१८.१०.२००६ च्या अर्जाला तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी दि. १४.११.२००६ च्या पत्रान्वये उत्तर दिले. सन १९९८ पासूनची विस्तृत माहिती श्री. क्षीरसागर यांनी मागितली होती. त्याची सुमारे ३००० पृष्ठ संख्या होत असून कळविलेले शुल्क त्यांनी भरले नाही. अपिलाच्या सुनावणीच्या वेळी अपिलीय प्राधिकारी व अन्य दोन शाळांमधील शिक्षिका यांच्या समवेत श्री. क्षीरसागर यांनी हुज्जत व शिवीगाळ, तसेच एकमेकांच्या अंगावर धाऊन जाण्याचा प्रकार झाल्यामुळे व अन्य तारखांना श्री. क्षीरसागर यांनी मूळ अर्जापेक्षा अन्य मुद्दे उपस्थित केल्याने सुनावणीची कार्यवाही पूर्ण होऊ शकली नाही, असे तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ, सोलापूर यांनी या खुलाशात म्हटले आहे. श्री. उंबरे यांच्या खुलाशाच्या अनुषंगाने आयोगाने श्री. क्षीरसागर यांना विचारणा केली. मात्र श्री. उंबरे यांनी नमूद केलेल्या बाबी कपोलकल्पित असून त्यातील विधाने आपल्याला मान्य नाहीत. आपल्या अशा वर्तनाबद्दल तत्कालीन

अपिलीय प्राधिकारी श्री. शरद भागवत ठुबरे यांनी पोलिसांकडे तक्रार केलेली नाही, असे श्री. [illegible] यांनी दि. २९.६.२००९ रोजी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात म्हटले आहे.

उभय पक्षांनी सादर केलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकारी यांनी माहितीचे एक [illegible] [illegible] अपिलार्थी प्रतीक्षेत पूर्ण माहिती तयार असून शुल्क भरल्यास त्वरित माहिती दिली जाईल. तथा अपिलीय प्राधिकारी तथा प्रशासन अधिकारी, महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ, [illegible] [illegible] [illegible] [illegible] आयोगाने आदेश पुढीलप्रमाणे :

आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १३.[illegible]

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे ४११ ००१

श्री.बंडोपंत मायाप्पा ढेंबरे
मु.राजोबाचीवाडी, पो. माडग्याळ, ता.जत,
जिल्हा सांगली

..... **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** समाजकल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, सोलापूर

..... **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** कार्यालयीन अधिक्षक,
समाजकल्याण विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५५ अ /२००९ सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | १२/११/२००८ |

**३**
**उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. बंडोपंत मायाप्पा ढेंबरे
मु.राजोबाचीवाडी, पो. माडग्याळ, ता. जत, जिल्हा सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा समाज कल्याण अधिकारी (गट अ ),
जिल्हा परिषद सोलापूर, श्री.म.व.काळे

**जन माहिती अधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
जिल्हा परिषद, सोलापूर, श्री.ए.एस.मेटकरी

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दिनांक २.८.२००६ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दिनांक २४.८.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दिनांक ६.११.२००६ |
| ७ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र -अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.बंडोपंत मायाप्पा ढेंबरे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.१२/११/२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली आहे. दरम्यानच्या काळात अपीलकर्ता श्री.बंडोपंत मायाप्पा ढेंबरे हे दि. २/६/२००९ मयत झाल्याबद्दलचा दि.२/१२/२००९ रोजीचा मृत्यू दाखला ग्रामसेवक, ग्रामपंचायत सोन्याळ, ता. जत, जिल्हा सांगली यांनी आयोगास सादर केलेला आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे : -

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**स्थळ : पुणे**
**दि. २५-०१-२०१०.**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्रीमती पौर्णिमा सुरेश कुलकर्णी
११५२-बी-वॉर्ड, मंगळवार पेठ, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस अधीक्षक(मु),
पोलीस अधीक्षक कार्यालय, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस उपअधीक्षक,
कोल्हापूर शहर, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५९ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ०७.०१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्रीमती पौर्णिमा सुरेश कुलकर्णी
११५२-बी-वॉर्ड, मंगळवार पेठ, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस अधीक्षक(मु),
पोलीस अधीक्षक कार्यालय, जि.कोल्हापूर प्रतिनिधी श्री.शहाजी उमाप

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस उपअधीक्षक,
कोल्हापूर शहर, जि.कोल्हापूर श्री.तुषार पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.८.१२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.५.२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६.११.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१३.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे दि.७.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

एका गुन्ह्यासंबंधी आपण मागितलेली कागदपत्रे व माहिती अपूर्ण देण्यात आली. शुल्क भरण्याबाबतचे पत्र आपल्याला मिळालेले नाही. कर्मचाऱ्यामार्फत माहिती पाठविल्याचे जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक, कोल्हापूर शहर यांचे म्हणणे सत्य नाही. कागदपत्रे अवलोकनासाठी आपण गेलो असता, ती दाखविण्यात आली नाहीत. 'नंतर बोलावू', असे सांगण्यात आले, परंतु नंतर काहीही कळविले नाही. अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस अधीक्षक, कोल्हापूर यांनी अपिलाचा निर्णय आपल्याला कळविला नाही. गुन्ह्यातील दोषी व्यक्तींना पक्षपातीपणे पाठीशी घालण्यासाठी माहिती अशा प्रकारे नाकारली जात आहे व असत्य बाबी सांगून दिशाभूल केली जात आहे, अशी तक्रार अपीलकर्त्या श्रीमती पौर्णिमा सुरेश कुलकर्णी यांनी केली.

श्रीमती कुलकर्णी यांनी अर्ज केला तेव्हा संबंधित प्रकरणाचा तपास चालू होता. त्यामुळे तपास पूर्ण झाल्यावर माहिती दिली जाईल, असे त्यांना कळविले. सात दिवसात गुन्ह्याचा तपास पूर्ण करून कार्यवाहीअंती श्रीमती कुलकर्णी यांना कागदपत्रे पुरवावीत, असे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस अधीक्षक (मु), पोलीस अधीक्षक कार्यालय, जि.कोल्हापूर यांनी दिले. त्यानुसार श्रीमती कुलकर्णी यांना कागदपत्रांसाठी शुल्क कळविले. परंतु विलंब लक्षात घेता

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तदतुदीनुसार माहिती नि:शुल्क मिळाली तरच स्वीकारू, असे श्रीमती कुलकर्णी यांनी कळविले. त्यानुसार पोलीस कर्मचाऱ्यामार्फत माहिती नि:शुल्क पाठविली असता ती घेण्यास त्यांनी नकार दिला. त्यानंतर रजिस्टर्ड टपालाने माहिती पाठविली. संबंधित प्रकरणातील कागदपत्रे त्यांना पाहण्यासाठी कधीही उपलब्ध करून दिली जातील व अतिरिक्त माहिती आवश्यक असल्यास दिली जाईल, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक, कोल्हापूर शहर श्री.तुषार पाटील यांनी केले. पाठविलेली पत्रे, स्टेशन डायरीतील नोंद, संबंधित कर्मचाऱ्यांची निवेदने / नोंदी आदींच्या प्रती त्यांनी सादर केल्या.

उभय बाजूंची निवेदने व त्यांनी सादर केलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती देण्याबाबत तत्परता दर्शविलेली नसली तरी माहिती नाकारलेली नाही. तसेच कागदपत्रांची पाहणी व अतिरिक्त माहिती देण्यास तयारी दर्शविली आहे. अपीलकर्त्यानी आवश्यक तर त्युनसार अभिलेखांचे अवलोकन करून हवी असलेली माहिती प्राप्त करून घ्यावी. जन माहिती अधिकाऱ्यांनी ती नि:शुल्क देणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १५.१.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

कॅप्टन(श्रीमती)पौर्णिमा सुरेश कुलकर्णी
११५२-बी-वॉर्ड, मंगळवार पेठ, कोल्हापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस अधीक्षक(मु),
पोलीस अधीक्षक कार्यालय, जि.कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस उपअधीक्षक,
कोल्हापूर शहर, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २५९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ७.०६.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** कॅप्टन(श्रीमती)पौर्णिमा सुरेश कुलकर्णी
११५२-बी-वॉर्ड, मंगळवार पेठ, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा पोलीस अधीक्षक(मु),
पोलीस अधीक्षक कार्यालय, जि.कोल्हापूर प्रतिनिधी श्री.शहाजी उमाप

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस उपअधीक्षक,
कोल्हापूर शहर, जि.कोल्हापूर श्री.तुषार पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.८.१२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.५.२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६.११.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१३.५.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे दि.७.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

एका गुन्ह्यासंबंधी आपण मागितलेली कागदपत्रे व माहिती अपूर्ण देण्यात आली. शुल्क भरण्याबाबतचे पत्र आपल्याला मिळालेले नाही. कर्मचाऱ्यामार्फत माहिती पाठविल्याचे जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक, कोल्हापूर शहर यांचे म्हणणे सत्य नाही. कागदपत्रे अवलोकनासाठी आपण गेलो असता, ती दाखविण्यात आली नाहीत. 'नंतर बोलावू', असे सांगण्यात आले, परंतु नंतर काहीही कळविले नाही. अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस अधीक्षक, कोल्हापूर यांनी अपिलाचा निर्णय आपल्याला कळविला नाही. गुन्ह्यातील दोषी व्यक्तींना पक्षपातीपणे पाठीशी घालण्यासाठी माहिती अशा प्रकारे नाकारली जात आहे व असत्य बाबी सांगून दिशाभूल केली जात आहे, अशी तक्रार अपीलकर्त्या कॅप्टन(श्रीमती) पौर्णिमा सुरेश कुलकर्णी यांनी केली.

श्रीमती कुलकर्णी यांनी अर्ज केला तेव्हा संबंधित प्रकरणाचा तपास चालू होता. त्यामुळे तपास पूर्ण झाल्यावर माहिती दिली जाईल, असे त्यांना कळविले. सात दिवसात गुन्ह्याचा तपास पूर्ण करून कार्यवाहीअंती श्रीमती कुलकर्णी यांना कागदपत्रे पुरवावीत, असे आदेश अपिलीय प्राधिकारी तथा पोलीस अधीक्षक (मु), पोलीस अधीाक कार्यालय, जि.कोल्हापूर यांनी दिले. त्यानुसार श्रीमती कुलकर्णी यांना कागदपत्रांसाठी शुल्क कळविले. परंतु विलंब लक्षात घेता

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तदतुदीनुसार माहिती निःशुल्क मिळाली तरच स्वीकारू, असे श्रीमती कुलकर्णी यांनी कळविले. त्यानुसार पोलीस कर्मचाऱ्यामार्फत माहिती निःशुल्क पाठविली असता ती घेण्यास त्यांनी नकार दिला. त्यानंतर रजिस्टर्ड टपालाने माहिती पाठविली. संबंधित प्रकरणातील कागदपत्रे त्यांना पाहण्यासाठी कधीही उपलब्ध करून दिली जातील व अतिरिक्त माहिती आवश्यक असल्यास दिली जाईल, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक, कोल्हापूर शहर श्री.तुषार पाटील यांनी केले. पाठविलेली पत्रे, स्टेशन डायरीतील नोंद, संबंधित कर्मचाऱ्यांची निवेदने / नोंदी आदींच्या प्रती त्यांनी सादर केल्या.

उभय बाजूंची निवेदने व त्यांनी सादर केलेली कागदपत्रे पाहता जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती देण्याबाबत तत्परता दर्शविलेली नसली तरी माहिती नाकारलेली नाही. तसेच कागदपत्रांची पाहणी व अतिरिक्त माहिती देण्यास तयारी दर्शविली आहे. अपीलकर्त्यांनी आवश्यक तर त्युनसार अभिलेखांचे अवलोकन करून हवी असलेली माहिती प्राप्त करून घ्यावी. जन माहिती अधिकाऱ्यांनी ती निःशुल्क देणे आवश्यक आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १५.१.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.शिवाजी जगन्नाथ वाडेकर
ओंकार, ३१, अंमली कॉलनी, गेंडामाळ, शाहूपुरी, सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी,
कॉमनवेल्थ इमारत, लक्ष्मी पथ, पुणे-३० — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा महाव्यवस्थापक,
शासकीय दुग्ध योजना, मरिआई गेटजवळ, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७१ +३३३ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शिवाजी जगन्नाथ वाडेकर
ओंकार, ३१, अंमली कॉलनी, गेंडामाळ, शाहूपुरी, सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी,
कॉमनवेल्थ इमारत, लक्ष्मी पथ, पुणे-३० प्रतिनिधी श्री.जे.ए.चौगुले

**जन माहिती अधिकारी** तथा महाव्यवस्थापक,
शासकीय दुग्ध योजना, मरिआई गेटजवळ, पुणे श्री.जे.ए.चौगुले

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.७.२००६ व१४.८.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २०.१०.२००६ व २०.१२.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ५.१२.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १६.१२.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२२.८.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे दि.२१.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

शासकीय दूध योजनेतील वर्ग-४च्या १४२ कर्मचाऱ्यांना उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार वेतनाच्या रकमेवरील व्याज का मंजूर केले नाही, तसेच दुग्धशाळा पर्यवेक्ष कै.एम.जी.शेख यांच्या वारसांना सुधारित वेतनश्रेणीचा लाभ का दिला नाही, याची माहिती दिली, परंतु ती चुकीची आहे. योग्य माहिती मिळावी व वेतन देयकासंबंधीची कार्यवाही व्हावी, अशी आपली मागणी असून जन माहिती अधिकाऱ्यांना शास्ती होण्याची मागणी नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.शिवाजी जगन्नाथ वाडेकर यांनी केले.

संबंधित विषयाबाबतची कार्यवाही अद्याप पूर्ण झालेली नाही. १४२ कर्मचाऱ्यांना द्यावयाच्या रकमेबाबत मंजुरीचा प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित आहे. तसेच श्री.शेख यांच्या सुधारित निवृत्ती वेतनाबाबत महालेखाकार, मुंबई यांच्याकडे कै.शेख यांचे मूळ सेवापुस्तक पाठविण्यात आले आहे. योग्य बाबींची खात्री करून न घेता श्री.वाडेकर यांनी त्याबाबतचा पत्रव्यवहार केला आहे, तसे त्यांना कळविण्यात आले आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा महाव्यवस्थापक, शासकीय दुग्ध योजना, मरिआईगेटजवळ, पुणे श्री.जे.ए.चौगुले यांनी केले.

श्री.वाडेकर यांची मूळ मागणी प्रशासकीय कार्यवाहीची आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयार्थ ती येत नाही. तथापि या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीची

माहिती त्यांना संबंधितांशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रतींसह द्यावी, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा महाव्यवस्थापक, शासकीय दुग्ध योज़ना, मरिआईगेटजवळ, पुणे श्री.जे.एस.चौगुले यांनी १४२ कर्मचाऱ्यांना द्यावयाच्या रकमेबाबत अवर सचिव(पदुम-६), कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना क्र.४४२/२००९, दि.२२.१.२००९ रोजी पत्र लिहून त्याची प्रत आयोगाला सादर करून अपीलकर्त्यासही पाठविली.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि.१८.१.२०१०**

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.शंकर लक्ष्मण चाळेकर
मु.पो.वेल्हे बु., ता.वेल्हा, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती वेल्हे, ता.वेल्हे, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत वेल्हे बु.,
ता.वेल्हे, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८१८+२८१९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.११.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शंकर लक्ष्मण चाळेकर
मु.पो.वेल्हे बु., ता.वेल्हा, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी,
पंचायत समिती वेल्हे, ता.वेल्हे, जि.पुणे तत्कालीन-श्री.ए.बी.मदने

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत वेल्हे बु.,
ता.वेल्हे, जि.पुणे
विद्यमान-श्री.सुनिल राजाराम माने, तत्कालीन-श्री.बाबासो बबनराव माने

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१५.१०.२००८ व १७.१०.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२१.१.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२४.११.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.४.४.२००९, २४.२.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलांचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२७.११.२००९ रोजी घेण्यात आली.

बोअरवेल ५५ फूट खणले व २०० फूट खोदकामाची रक्कम दिली, एस.टी.जात नाही अशा ठिकाणी शेड बांधली, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हद्दीत त्यांच्या परवानगीशिवाय बांधकाम केले, ग्रामपंचायतीने केलेल्या बांधकामांचा पूर्ण तपशील, अंदाजपत्रक, गुणवत्ता नियंत्रण अहवाल यातील कोणतीही माहिती दिली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.शंकरराव बबनराव चाळेकर यांनी केली.

श्री.चाळेकर यांनी दोन अर्जाद्वारे विस्तृत स्वरूपाची व विविध विभागांशी संबंधित अशी माहिती मागितली होती. त्यावेळी कामांचे मूल्यांकन झालेले नव्हते. दोन महिन्यांत ते पूर्ण करून देण्यात येईल, असे अपीलकर्त्यास सांगितले व त्यानुसार टपालाने माहिती पाठविली. सार्वजनिक बांधकाम खात्याकडे परवानगी मागण्याच्या प्रतीसह उपलब्ध सर्व माहिती आपणही दिली व दुसऱ्या अर्जाद्वारे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत वेल्हे बु., ता.वेल्हे, जि.पुणे श्री.एस.आर.माने यांनीही दिली, असे प्रतिपादन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत वेल्हे बु., ता.वेल्हे, जि.पुणे श्री.बी.बी.माने यांनी केले. बोअरवेलचे साहित्य आणण्याचे काम आपण केले. ग्रामीण पाणीपुरवठा स्वच्छता समिती त्याचे काम पाहते. त्या संबंधातील माहिती

संस्थेचे सचिव व अध्यक्ष यांच्याकडून मागणी करून दिली. त्यावेळी अध्यक्ष व सचिव वेगळे होते. दि.१२.८.२००९ पासून सरपंच अध्यक्ष व ग्रामसेवक सचिव अशी व्यवस्था आहे. इतर विभागांकडून माहिती मिळवून द्यावयाची होती. त्याबाबत पत्रव्यवहार केला व मिळालेली माहिती दिली. भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, पुणे जिल्हा परिषद, पुणे यांच्याकडील माहिती पाठपुरावा करूनही न मिळाल्यामुळे देता आली नाही. अन्य सर्व माहिती दिली आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती वेल्हे, ता.वेल्हे, जि.पुणे श्री.ए.बी.मदने यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

दोन स्वतंत्र अर्जांची दोन स्वतंत्र पाकिटे करून श्री.चाळेकर यांना माहिती पाठविली. विद्यमान ग्रामसेवकांकडून मिळालेल्या माहितीची तारीख ते आधीच्या अर्जाबाबत दाखवून वैयक्तिक आकसापोटी आपल्याविरूध्द तक्रार करीत आहेत, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत वेल्हे बु., ता.वेल्हे, जि.पुणे श्री.बी.बी.माने यांनी लेखी निवेदनात म्हटले आहे.

माहिती देण्यासाठी तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अन्य विभागांशीही पत्रव्यवहार करून प्रयत्न केला असल्याचे उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे यावरून दिसते. पाणीपुरवठ्याचे पाईप, पत्रे, कौले कोठे गेले याचा पुरावा नाही, ग्रामपंचायतीचा पाणीपुरवठ्याचा नवीन पंप चोरीला गेला त्यावर कारवाई नाही, स्मशानभूमी रस्ता अत्यंत खराब आहे, आदी मुद्दे श्री.चाळेकर यांनी लेखी निवेदनात नमूद केले आहेत. परंतु या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत निर्णयार्थ येत नाहीत. तसेच, श्री.चाळेकर यांनी माहिती-मागणीच्या अर्जात खुलासा, भाष्य याची विचारणा केली असून ती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ मधील 'माहिती'च्या व्याख्येत समाविष्ट होत नाही.

आपल्याला अद्यापही पूर्ण माहिती मिळाली नसल्याची तक्रार श्री.चाळेकर यांनी दि.१३.१.२०१० च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. मूळ अर्जानुसार नेमकी कोणती माहिती मिळाली नाही, हे त्यांनी स्पष्ट केलेले नाही. मूळ अर्जानुसार माहिती द्यावयाची राहिली असल्यास

नेमकेपणाने त्याचा उल्लेख करून श्री.चाळेकर यांनी जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत वेल्हे बु., ता.वेल्हे, जि.पुणे यांच्याकडे निवेदन द्यावे व त्यानुसार जन माहिती अधिकाऱ्यांनी पूर्तता करावी, असे मौखिक आदेश सुनावणीचया वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(२) आयोगाच्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत वेल्हे बु., ता.वेल्हे, जि.पुणे श्री.सुनिल राजाराम माने यांनी दि.२०.२.२०१० पर्यंत आयोगाला सादर करावा, व त्याची प्रत अपीलकर्त्यास पाठवावी.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.३०.१.२०१०**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री.अशोक बबनराव नाग वडे
एच-५/१५, एस.टी.कॉलनी,
पुणे-सातारा रोड, पुणे ४११ ००९

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभाग नियंत्रक,
राज्य मार्ग परिवहन महामंडळ, स्वारगेट आगार,
वीर सावरकर नगर, पुणे-३७

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा आगार व्यवस्थापक (क.),
राज्य मार्ग परिवहन महामंडळ, स्वारगेट आगार,
वीर सावरकर नगर, पुणे-३७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७४० / पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रम | दि.२५.०२.२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९.०६.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१०.०७.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२१.०८.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.- |
| ७ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

संदर्भ :- अपील क्र.२७४५/पुणे,आदेश दि.१६.०३.२००९

**शुध्दीपत्रक**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे यांच्या दि.१६.०३.२००९ रोजीच्या संदर्भाधीन आदेशामध्ये अनुक्रमांक २ वर नमूद केलेल्या अपील क्र.२७४५/पुणे ऐवजी अपील क्र.२७४०/पुणे असे वाचावे, तसेच मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) मध्ये 'सर्वश्री शेख, खंडागळे, सोनवणे या चालकांच्या बदलीबाबत व अन्य कर्मचाऱ्यांच्या बदलीबाबत एकूण सहा मुद्यांची माहिती' ऐवजी 'प्रमादीय कारवाईबाबतची माहिती' असे वाचावे.

**पुणे**
**दिनांक :** ३०/०१/२०१०

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री.अशोक बबनराव नाग वडे
एच-५/१५, एस.टी.कॉलनी,
पुणे-सातारा रोड, पुणे ४११ ००९

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विभाग नियंत्रक,
राज्य मार्ग परिवहन महामंडळ, स्वारगेट आगार,
वीर सावरकर नगर, पुणे-३७

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा आगार व्यवस्थापक (क.),
राज्य मार्ग परिवहन महामंडळ, स्वारगेट आगार,
वीर सावरकर नगर, पुणे-३७

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७४० / पुणे |
| २ | विशेष अपील निर्गत कार्यक्रम | दि.२५.०२.२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९.०६.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१०.०७.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२१.०८.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.- |
| ७ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

संदर्भ :- अपील क्र.२७४५/पुणे,आदेश दि.१६.०३.२००९

**<u>शुध्दीपत्रक</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे यांच्या दि.१६.०३.२००९ रोजीच्या संदर्भाधीन आदेशामध्ये अनुक्रमांक २ वर नमूद केलेल्या अपील क्र.२७४५/पुणे ऐवजी अपील क्र.२७४०/पुणे असे वाचावे, तसेच मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) मध्ये'सर्वश्री शेख, खंडागळे, सोनवणे या चालकांच्या बदलीबाबत व अन्य कर्मचाऱ्यांच्या बदलीबाबत एकूण सहा मुद्यांची माहिती'ऐवजी 'प्रमादीय कारवाईबाबतची माहिती' असे वाचावे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**पुणे**
**दिनांक : ३०/ ०१/२०१०**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे ४११ ००१

श्री. सत्त्वशील धैर्यशील शेळके
मु.पो.लोणंद, ता. खंडाळा, जि. सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, खंडाळा ता. खंडाळा, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार, खंडाळा, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २७७ + २६८ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.८.२००८ |
| ३ | **उपस्थित** | |

**अपीलकर्ता** — श्री. सत्त्वशील धैर्यशील शेळके
मु.पो.लोणंद, ता. खंडाळा, जि. सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा — तहसीलदार, खंडाळा, ता. खंडाळा, जि.सातारा
श्री. जी. एस. सांगडे

**जन माहिती अधिकारी** तथा — निवासी नायब तहसीलदार, खंडाळा, जि. सातारा
श्री. बी. ए. खुंटे

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | |
|---|---|---|---|---|---|
| २७७ / सातारा | ९.५.२००७ | १३.३.२००७ | ३१.८.२००७ | २३.१०.२००७ | |
| २६८ / सातारा | ७.१.२००८ | २२.२.२००८ | १४.२.२००८ | १४.३.२००८ | |

माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

गाव कामगार तलाठी, लोणंद यांनी केलेल्या पीकपाहणी पंचनाम्याची प्रत वारंवार मागणी करुनही आपल्याला दिली जात नाही. तलाठ्याने चुकीची पीकपाहणी नमूद करून ७/१२ उतारा दिलेला असताना त्यांच्यावर कारवाई केली नाही. आपण याबाबत अनेक अर्ज केले असून आपल्या आईनेही अर्ज व अपिले केली आहेत. तरीही गाव कामगार तलाठ्याने केलेल्या पंचनाम्याची प्रत जाणीवपूर्वक दिली जात नाही, म्हणून तलाठी व मंडल अधिकारी, लोणंद यांच्यावर कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. सत्त्वशील धैयशील शेळके यांनी केली.

श्री. शेळके यांनी अर्जात नमूद केलेला दि. ११.११.२००६ रोजी करण्यात आलेला पीक-पाहणी पंचनामा दोन पंचासमक्ष गाव कामगार तलाठी, लोणंद व मंडल अधिकारी, लोणंद यांनी संयुक्तरीत्या केला असून गाव कामगार तलाठी, लोणंद यांनी वेगळा पंचनामा केलेला नाही. त्यामुळे त्याची प्रत देता येत नाही, असे श्री. शेळके यांना अनेकदा कळविण्यात आले. तसेच त्यांनी मागितलेल्या सर्व कागदपत्रांच्या प्रतीही देण्यात आल्या, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, खंडाळा श्री. बी. ए. खुंटे यांनी केले. ते रास्त असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, खंडाळा श्री. जी. एस. सांगडे यांनी सांगितले. मूळ अभिलेखात नसलेल्या माहितीचा अभिलेखात समावेश करून विपर्यस्त व दिशाभूल करणारी माहिती दिल्याबद्दल तत्कालीन गाव कामगार तलाठी, लोणंद श्री. के.पी. शेंडे यांच्यावर एक वेतनवाढ पुढील वेतनवाढीवर परिणाम न होईल अशी स्थगितम करण्याची कारवाई पूर्वीच करण्यात आली असल्याचा अहवाल उपविभागीय अधिकारी, वाई उपविभाग, वाई श्री. दीपक नलवडे यांनी सादर केला असून त्याची प्रत अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, खंडाळा श्री. जी. एस. सांगडे यांनी सादर केले.

श्री. शेळके यांनी मागणी केल्याप्रमाणे तलाठी, लोणंद यांच्याकडून पीक पाहणी पंचनामा मिळाल्या मुळेच ७/१२ वरील पीक पाहणी व प्रत्यक्षातील पीक पाहणी वेगळी असल्याचे त्यांच्या लक्षात आले व त्यामुळेच उपविभागीय अधिकारी, वाई यांच्याकडे त्यांनी दाद मागितली. यावरून त्यांना माहिती देण्याचा गांभीर्याने प्रयत्न झाल्याचे दिसून येते, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, श्री. सुनिल नागनाथ शेरखाने यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे.

पुनर्वसन प्रक्रिया चुकीच्या पध्दतीने राबविली, खोटा पंचनामा केला, आपल्या विरूध्द खोटे गुन्हे नोंदविले आदी आरोप श्री. शेळके यांनी विविध कागदपत्रांसह व निवेदनामध्ये केले आहेत. या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत.

श्री. शेळके यांनी दि. २२.९.२००६ ते दि. ५.७.२००९ या काळात ८१ व श्रीमती सुमन धैयशील शेळके यांनी ४ असे एकूण ८५ अर्ज एकाच प्रकरणाच्या संदर्भात केले असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, खंडाळा यांनी दि. ५.९.२००९ च्या पत्रान्वये पूर्ण तपशिलासह आयोगास अवगत केले. 'निव्वळ त्रास देण्याच्या हेतूने माहिती मागविली जात असून कार्यालयाचा प्रचंड वेळ व श्रम वाया जात आहे, त्यामुळे यापुढे आपणांस माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत जे कागदपत्र या कार्यालयात उपलब्ध असतील त्याबाबत अचूक माहिती मागितलेस माहिती देणेत येईल, अन्यथा तुम्हांस कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही अथवा कोणतेही उत्तर दिले जाणार नाही,' असे तहसीलदार खंडाळा श्री. जी. एस. सांगडे यांनी श्री. शेळके यांना दि. ५.९.२००९ रोजी पाठविलेल्या पत्रात नमूद केले आहे. अपीलकर्त्याच्या अर्जांचे प्रमाण व मुद्दयांचे स्वरूप पाहता अशा प्रकारचे पत्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत कार्यवाहीच्या संदर्भात रास्त ठरते.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि. २७.१.२०१०**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

१) श्रीमती पुष्पा मारुती कापसे **अपीलकर्ता**

२) श्री. शिवाजी आनंदा कापसे
घर नं. २६४६, डी वॉर्ड, जुना बुधवार पेठ,
डांगे गल्ली पाठीमागची बाजू,
कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उप आयुक्त **उत्तरवादी**
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी तथा** आरोग्य अधिकारी,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | **२८/२०१०/ कोल्हापूर** |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४.६.२००९ |
| ३ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.९.२००९ |
| ४ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२.९.२००९ |
| ५ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-** कोल्हापूर महानगरपालिकेच्या अखत्यारितील वैद्यकीय सेवेसंदर्भात एकूण १२ मुद्दे | |

## विवेचन

अपीलकर्ता, श्रीमती पुष्पा मारुती कापसे व श्री शिवाजी आनंदा कापसे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडलेल्या कागदपत्रांवरुन मूळ माहिती मागणी अर्ज हा श्रीमती पुष्पा मारुती कापसे यांच्या नावे जन माहिती अधिकारी यांच्याकडे करण्यात आलेला आहे, तर प्रथम अपिल हे श्री शिवाजी आनंदा कापसे यांच्या नावे अपिलीय प्राधिका-याकडे करण्यात आले आहे. आयोगाकडे दोघांच्याही नावे अपील करण्यात आले आहे. अशारितीने मूळअर्जदाराच्या वतीने अपील करणे, तसेच अपीलकर्ते म्हणून मूळ अर्जदाराव्यतिरिक्त नावे अपिलात समाविष्ठ करणे अपील विषयक कार्यपध्दतीनुसार योग्य नाही. यास्तव सदर अपिलांवर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढील प्रमाणेः-

## आदेश

अपील दाखल स्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

पुणे
दि. ३०-१-२०१०